# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

OW/DCP TRAFFIC THN/ADM/ NOTIFICATION/ 59 /2018
पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग,यांचे कार्यालय, तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दिनांक :–07092018
दुरध्वनी क्रमांक 022- 25401056

**–:वाहतुक नियंत्रण अधिसुचना:–**

ठाणे शहरात गणपती विसर्जन दिवशी म्हणजेच दि. १४/०९/२०१८ दि. १७/०९/२०१७, दि. १९/०९/२०१८ दि. २३/०९/२०१८ ( अनंत चतुर्दशी ) रोजी गणपती विसर्जन मिरवणुकीत भावीकांची गर्दी होते. मिरवणुक मार्गावर व परिसरात वाहतुक कोंडी होउ नये व वाहतुक सुनिश्चित रहावी या करीता आम जनतेच्या सोईसाठी

महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर, दिनांक २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी अमित का. काळे, पोलीस उप आयुक्त,शहर वाहतुक शाखा, ठाणे शहर पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

१) विष्णुनगर नौपाडा, सोपान चौक, राममारूती रोड, मासुंदा तलाव मार्गे ठाणे स्टेशनकडे जाण्यास सर्व उपरस्ते हे (**नमस्कार हॉटेल क्रास**) सर्व प्रकारच्या वाहनांना **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सरदची वाहने राम मारूती रोडने – स्विट कॉर्नर – गांवदेवी बसस्टॉप वरून पुढे शिवाजीपथवर उजवीकडे आंबेडकर चौक मार्गे ठाणे स्टेशनकडे जातील.

२) ठाणे स्टेशन येथुन गांवदेवी मार्गे शिवाजी पथने मिनाताई ठाकरे चौक व कळवा बाजुकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना **गांवदेवी क्रॉस** येथुन **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने ठाणे स्टेशन येथुन गोखले रोडने कल्पना केंद्र –म.फुले मार्गे –घंटाळी चौक–तिन पेट्रोल पंप–पुढे एल.बी.एस.मार्गाने सरळ मिनाताई ठाकरे चौक किंवा ठाणे स्टेशन येथुन आंबेडकर चौक – अशोक सिनेमा –एस.टी.आउट गेट –चेंदनी कोळीवाडा–सिडको रोड मार्गे कळवा बाजुकडे जातील.

३) चरई भागातुन व विर सावरकर रोडने गडकरी सर्कलकडे येण्यास सर्व वाहनांना **हॉटेल कोल्हापुर** येथुन **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदरची हलकी वाहने सावरकर रोड टिळक चौक येथुन पुढे जावुन भवानी चौकातुन कोर्टनाका –पोलीस स्कुल मार्गे पारेख ट्रान्सपोर्ट येथून किंवा क्रिक नाका येथुन क्रिक रोडने इच्छित स्थळी जातील.

४) डॉ. मुस रोड ते गडकरी सर्कल ते टॉवर नाका ते मुस चौक या रोडवर (तलावपाळी परीसर) गणपती विसर्जनासाठी गणेशमुर्ती घेवुन आलेली वाहने मुर्ती उतरविल्यावर सदर ठिकाणी वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– नौका विहार तलावपाळी, दत्त मंदिर समोरील घाट व जीवन पांगे घाट (टॉवर नाका) येथे गणपती विसर्जनासाठी आलेली वाहने ही मुर्ती उतरविल्यावर ताबडतोब हायवे सर्व्हिस रोड येथे पार्किंगसाठी जातील.

५) **बेस्ट बसेस** :–मॉडेला चेक नाका मार्गे तीनहात नाका येथे वळण घेवुन जाणा–या बसेसना **मॉडेला चेक नाका** येथुन **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :– सदर बसेस या विसर्जनाच्या दिवशी मुलूंड चेक नाका येथुन फिरून परत जातील.

६) हरीनिवास नाक्याकडुन तीन **पेट्रोल पंपावरून सरळ गजानन चौकाकडे** जाण्यास **प्रवेश बंद** करण्यात येत आहे.
**पर्यायी मार्ग** :–दि. २५/०८/२०१७ रोजी पासुन रोटरी पद्धतीने वाहतुकीत बदल करण्यात आलेला असुन सार्वजनिक गणेशोत्सव दरम्यान २६/०८/२०१७ दि. २९/०८/२०१७, दि. ३१/०८/२०१७ दि. ०५/०९/२०१७ ( अनंत चतुर्दशी ) दिवशी, सार्वजनिक व खाजगी गणपती हे तिन पेट्रोल पंप येथुन सरळ गजानन चौकाकडे न जाता डावीकडे वळण घेवुन वंदना टी पॉईट येथुन उजवीकडे गजानन चौकातुन राम मारूती रोडने गाडगीळ चौकातील '' **बबल्स दुकानाकडुन** '' डावीकडे वळुन मासुंदा तलाव येथे विसर्जनासाठी जातील.

सदरची अधिसुचना ही गणपती विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. १४/०९/२०१८ दि. १७/०९/२०१७, दि. १९/०९/२०१८ दि. २३/०९/२०१८ ( अनंत चतुर्दशी ) रोजी दुपारी १४:०० वा.पासुन गणपती विसर्जन गणपती कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहील.

सदरची अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड,रूग्णवाहिका तसेच अत्यावश्यक सेवेतील वाहने व गणपती मुर्ती विसर्जनाच्या वाहनांना यांना लागु राहनार नाही.

( अमित का.काळे )
पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग
ठाणे शहर

प्रति,
जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**
मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे
मा.जिल्हाधिकारी,ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–
प्रादेशिक परिवहन अधिकारी ,ठाणे.
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ ठाणे व ५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.